# मुंबई विद्यापीठ

नेमणूक कक्ष, परीक्षा विभाग
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पू),
मुंबई- ४०००९८.

क्र. AU/ECC/2025-26/05

**परिपत्रक :**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक / विभाग प्रमुख / विद्यापीठ संलग्नित कला / वाणिज्य / विज्ञान / व्यवस्थापन / शिक्षणशास्त्र / औषधशास्त्र / वास्तु शास्त्र / अभियांत्रिकी व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय / समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अंबाडवे / समन्वयक, विजयलक्ष्मी दळवी महाविद्यालय तळेरे / समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र / समन्वयक ठाणे परिक्षेत्र / समन्वयक, स्कुल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लाईड सायन्सेस कल्याण उपकेंद्र, यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या **शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी** (अनुदानित/विना अनुदानित/सेल्फ फायनान्स) यांची परिपूर्ण माहिती दि. ०३ ऑक्टोबर , २०२५ पर्यंत खालील दिलेल्या गुगल फॉर्म लिंक वर सोबत जोडलेल्या प्रपत्रात अद्ययावत करावी. सदर माहिती तयार करत असताना महाविद्यालयाचा OU कोड, अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्र कोड, कोर्स चे नाव व कोर्स कोड अचूक नोंदवावेत. याची माहिती सोबत दिलेल्या फाईल फॉर्मेट मधील प्रपत्रा मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संबंधित माहिती जमा करण्यासाठी https://forms.gle/Vfk4hdiHPAzAbBg79 लिंक वर जाऊन गुगल फॉर्म उघडावा, फॉर्म वरील फाईल ची प्रत डाउनलोड करून घ्यावी आणि फाईल मधील "Staff Information" या शिट मध्येच माहिती भरावी आणि माहिती भरून झाल्यावर याच फॉर्म मध्ये उपलोड करावी.

**महत्वाचे :-** सदर माहिती विद्यापीठाच्या ई- समर्थ प्रणाली मध्ये उपलोड केली जाणार असून, माहिती ई-समर्थ प्रणाली मध्ये उपलोड झाल्यावर आपल्या महाविद्यालयामधील सर्व **शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी** (अनुदानित/विना अनुदानित/सेल्फ फायनान्स) यांना ई-समर्थ प्रणाली चे युजर नेम आणि पासवर्ड ई-मेल च्या माध्यमातून पाठवण्यात येतील. त्यानंतर सर्व संबधित वापरकर्त्यांनी आपली पूर्ण प्रोफाईल ई-समर्थ प्रणाली मध्ये लॉगइन करून "Employee Profile" या भागामध्ये जाऊन अद्यायावत करावी. भविष्यात हीच माहिती विद्यापीठाच्या विविध कार्य प्रयोजनासाठी वापरण्यात येईल जसे संलग्नीकरण, CAS, परीक्षा इ.

तसेच आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयीन संलग्नता व विकास विभाग (CAD), महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष (CTAU), प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर कक्ष (AEM), विद्याविषयक नियुक्ती गुणवत्ता कक्ष (AAQA) यांचेमार्फत प्राप्त होणारे नाव नोंदणी अर्ज पात्रता व स्थलांतरण प्रमाणपत्र, वाढीव विद्यार्थी संख्या, महाविद्यालयांस देण्यात येणारे नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, वाढीव तुकडी, तसेच प्राचार्य / प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक / ग्रंथपाल व क्रीडा संचालक यांच्या मान्यतेबाबतची परिपूर्तता करण्यापूर्वी उपकुलसचिव, नेमणूक कक्ष परीक्षा विभाग यांचेकडून **'ना हरकत प्रमाणपत्र'** सादर करणे संबंधित महाविद्यालये, संस्था व विभागांना अनिवार्य करण्यात आलेले आहे.

....२/-

"APPOINTMENT UNIT EXAM (TEACHER'S INFO)."

याबाबत आपणास कळविण्यात येते की, जी महाविद्यालये शिक्षकांची माहिती अद्ययावत करणार नाहीत त्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता **'ना हरकत प्रमाणपत्र'** वितरीत करण्यात येणार नाही आणि सदर बाबत काही समस्या उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागांचे विभागप्रमुख / महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी .

माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी व समस्या उदभवल्यास ईमेलद्वारे किंवा खालील क्रमाकांवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

ई: मेल- appunit@exam.mu.ac.in.

दूरध्वनी क्रमांक : 7208233265

मुंबई ४०० ०९८ डॉ. पूजा रौंदाळे

२३ सप्टेंबर, २०२५ संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत अग्रेषित:

१. मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख / विद्यापीठ संलग्नित कला / वाणिज्य / विज्ञान / व्यवस्थापन / शिक्षणशास्त्र / औषधशास्त्र / वास्तु शास्त्र / अभियांत्रिकी व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक आणि प्राध्यापक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय / समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अंबाडवे / समन्वयक, विजयलक्ष्मी दळवी महाविद्यालय तळेरे / समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र / समन्वयक ठाणे परिक्षेत्र / समन्वयक, स्कुल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लाईड सायन्सेस कल्याण उपकेंद्र.

२. स्वीय सहाय्यक संचालक व परीक्षा मुल्यमापन मंडळ

३. मा. कुलगरुंचे स्वीय सहाय्यक

४. मा. प्र- कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक

५. मा. कुलसचीवांचे स्वीय सहाय्यक

६. महाविद्यालयीन संलग्नता व विकास विभाग (CAD)

७. महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष (CTAU)

८. प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थानांतर कक्ष (AEM)

९. विद्याविषयक नियुक्ती व गुणवता कक्ष (AAQA)